ePaper

## इस्रायलच्या माजी लष्करप्रमुखांचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहूंना आव्हान?



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 01 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

दापोडीत 10.85 लाखांचा एमडी ड्रग्ज जप्त; दोघे अटकेत



## जन्मठेपेला स्थगिती नाहीच अन जामीनही नामंजूर..

# आसाराम बापूला 'सर्वोच्च' दणका!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या स्वयंघोषित आध्यात्मिक गुरु आसाराम बापू याला सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळालेला नाही. राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या त्याच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला. प्रकृती गंभीर झाल्यास किंवा जीवाला धोका निर्माण झाल्यासच जामिनाबाबत विचार केला जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.**

न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि शील नागू यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने या टप्प्यावर शिक्षेला स्थगिती देण्यास नकार देत कारागृह प्रशासनाला आसारामला आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. तसेच राजस्थान सरकारला दोन आठवड्यांत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे.

आसारामच्या वतीने ज्येष्ठ वकील डी. एस. नायडू यांनी तो ८० वर्षांहून अधिक वयाचा असून विविध आजारांनी त्रस्त असल्याने जामीन मंजूर करावा, अशी मागणी केली. मात्र, केवळ वय किंवा आजारपण हा जामिनाचा आधार ठरू शकत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने ही मागणी फेटाळली.

यापूर्वी २७ मे रोजी राजस्थान उच्च न्यायालयाने आसारामची दोषी ठरवण्याची कारवाई आणि जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली होती. अल्पवयीन मुलीवरील बलात्काराशी संबंधित भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(एफ) अंतर्गत त्याची शिक्षा कायम ठेवण्यात आली आहे. तसेच पोक्सो कायद्यातील काही कलमांखालील दोषी ठरवण्याचा निर्णयही कायम आहे. मात्र, सामूहिक बलात्कार आणि गुन्हेगारी कटासह काही आरोपांतून त्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती.

हे प्रकरण २०१३ मधील असून, आश्रमात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर बलात्कार केल्याचा आरोप आसारामवर आहे. या प्रकरणात २५ एप्रिल २०१८ रोजी कनिष्ठ न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर राजस्थान उच्च न्यायालयानेही ती शिक्षा कायम ठेवली. आता सर्वोच्च न्यायालयानेही तातडीचा दिलासा नाकारल्याने आसारामला आणखी एक मोठा न्यायालयीन धक्का बसला आहे.

### आसारामवर कोणते आरोप कायम?

चुकीच्या पद्धतीने डांबून ठेवणे, मानवी तस्करी, गुन्हेगारी स्वरूपाची धमकी देणे, महिलेच्या विनयभंगाचा प्रयत्न करणे आणि लैंगिक अत्याचार यांसारख्या आरोपांखाली आसारामला दोषी ठरवण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. याव्यतिरिक्त, पोक्सो (POCSO) कायद्याच्या कलम ७ व ८ आणि बाल न्याय (JUVENILE JUSTICE) कायद्याच्या कलम २३ अन्वये त्याला दोषी ठरवण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. मात्र, गुन्हेगारी कट आणि सामूहिक बलात्कार यांसारख्या काही आरोपांतून न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केली. सह-आरोपी संचिता गुप्ता (उर्फ शिल्पी) आणि शरत चंद्र यांची उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

### २०१३ मध्ये अटक २०१८ ला जन्मठेपेची शिक्षा

हे प्रकरण २०१३ मधील आहे. आसारामने त्याच्या आश्रमात शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. खटल्याच्या सुनावणीनंतर, कनिष्ठ न्यायालयाने त्याला दोषी ठरवले आणि २५ एप्रिल २०१८ रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्यानंतर आसारामने राजस्थान उच्च न्यायालयात अपील केले, परंतु तिथेही त्याला कोणताही दिलासा मिळाला नाही. आता त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे, जिथे त्याला सध्या तरी केवळ नोटीस जारी होण्यापुरता मर्यादित दिलासा मिळाला आहे.



### वय आणि आजारपणाचा आधार अपुरा

आसारामच्या वतीने ८० वर्षांहून अधिक वय आणि विविध आजारांचा आधार देत जामिनाची मागणी करण्यात आली. मात्र, केवळ वय किंवा आजारपणाच्या आधारे जामीन मंजूर करता येणार नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने अर्ज फेटाळला. प्रकृती अत्यंत गंभीर होऊन जीवाला धोका निर्माण झाल्यासच जामिनाबाबत विचार केला जाईल, असे न्यायालयाने नमूद केले.

# पुणे जिल्ह्यात पावसाची हजेरी

## बुधवारपासून मध्यम ते मुसळधारेचा अंदाज; जुलैचा पहिला आठवडा जोरदार पावसाचा

**महाईन्यूज । पुणे**

**यंदाचा पावसाळा एल निनोच्या सावटाखाली असताना जूनमध्ये पुण्यातील शिवाजीनगर येथे ६४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. यंदाचा जूनमधील पाऊस गेल्या तीन वर्षांतील सर्वांत कमी असून, २०१४ ते २०२५ या कालावधीत शिवाजीनगर येथील जूनमधील पावसाच्या आकडेवारीत यंदाचा पाऊस तिसऱ्या क्रमांकाचा नीचांकी ठरला असल्याचे स्पष्ट झाले आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात मोसमी पावसाचे पुनरुज्जीवन होऊन जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.**



अनुकूल स्थितीअभावी मोसमी वाऱ्यांच्या प्रगतीला विलंब झाला. जून महिना संपत येऊनही अद्याप जोरदार पाऊस शहर परिसरात झालेला नाही. नारायणगाव, राजगुरूनगर अशी काही ठिकाणे वगळता जिल्ह्यातही पावसाचे प्रमाण कमीच आहे. मात्र, घाट परिसरात पाऊस सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे.

हवामान विभागाच्या आकडेवारीचा आढावा घेतला असता गेल्या दशकभरात तीन वेळा जूनमध्ये शिवाजीनगर येथे १०० मिलिमीटरपेक्षा कमी पाऊस नोंदवला गेला आहे. त्यात सर्वांत कमी ३५ मिलिमीटर पाऊस २०२२मध्ये झाला होता. त्यानंतर २०१६मध्ये ५९ मिलिमीटर, तर २०२३मध्ये ८३.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. त्यामुळे यंदा शिवाजीनगर येथे झालेला ६४ मिलिमीटर पाऊस हा दशकभरातील कमी पावसाच्या अनुषंगाने तिसऱ्या क्रमांकांचा ठरला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या पुणे वेधशाळेतील शास्त्रज्ञ एस. डी. सानप म्हणाले, ३ जुलैच्या सुमारास बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे वारे मजबूत होऊन ३ ते ६ जुलै या कालावधीत चांगला पाऊस होण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांत कोकण किनारपट्टी, मुंबईसारख्या काही भागात पाऊस सुरू झाला आहे. आता जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाचे पुनरुज्जीवन होऊ शकते. तसेच उर्वरित जुलैमधील पावसावर लक्ष ठेवण्यात येईल.

पुणे जिल्ह्यात १ ते ३० जून या कालावधीत १३३ मिलिमीटर पाऊस पडतो. यंदा केवळ ५२ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला असून, जिल्ह्यात सरासरीपेक्षा ६१ टक्के कमी पाऊस झाल्याचे हवामान विभागाच्या आकडेवारीवरून दिसून येते.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाचे लक्ष आता आगामी काही दिवसांतील पावसाच्या स्थितीकडे लागले आहे. पुरेसा पाऊस झाल्यास पाणीटंचाई, शेती आणि जलसाठ्यांवरील ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र, पावसाचा पुढील अंदाज आणि प्रत्यक्ष परिस्थितीवर हवामान विभाग सातत्याने लक्ष ठेवून आहे.

### पावसाची वर्षनिहाय आकडेवारी

- २०१५ – २११.२
- २०१६ – ५९
- २०१७ – २०७.८
- २०१८ – १४८
- २०१९ – १९७.९
- २०२० – २०७.७
- २०२१ – १५२.५
- २०२२ – ३५
- २०२४ – ८३.९
- २०२४ – २५२
- २०२५ – २६७.५
- २०२६ – ६४

# पुण्यात कॅफेत घुसून PSI चा धिंगाणा; ग्राहकांना हाकललं

**महाईन्यूज । पुणे**

**डेक्कन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिरोळे रस्त्यावरील एका कॅफेत जाऊन धिंगाणा घातल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक (PSI) संदीप कदम यांना निलंबित करण्यात आले आहे. कर्तव्यावर असतानाच त्यांनी कॅफेमध्ये गैरवर्तन केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलीस प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेत ही कारवाई केली. अप्पर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांनी निलंबनाचे आदेश जारी केले.**



याप्रकरणी अधिक माहिती अशी की, संदीप कदम हे डेक्कन पोलीस ठाण्यात कार्यरत असून ६ ते ७ जून दरम्यान त्यांची रात्रगस्त अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यावेळी पहाटे १.४५ वाजण्याच्या सुमारास ते शिरोळे रस्त्यावरील जिप्सीया कॅफे येथे पोहोचले. यावेळी त्यांनी कॅफेच्या काउंटरवरील कॉफीचे ग्लास आणि इतर साहित्य खाली फेकून दिल्याचा आरोप आहे. तसेच कॅफेमध्ये बसलेल्या ग्राहकांना उठून बाहेर जाण्यास सांगितले. याशिवाय कॅफेतील कर्मचाऱ्यांशी अरेरावीची भाषा वापरत गैरवर्तन केल्याचेही समोर आले आहे.

हा संपूर्ण प्रकार कॅफेमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. त्यानंतर या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. पोलीस अधिकाऱ्याचे असे वर्तन समोर आल्यानंतर नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलीस प्रशासनाने अंतर्गत चौकशी केली. चौकशीत प्रथमदर्शनी गैरवर्तन झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर हे कृत्य बेजबाबदार असून त्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर अप्पर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांनी संदीप कदम यांच्या कृत्याची गंभीर दखल घेत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. या घटनेनंतर पोलीस दलातील शिस्त आणि जबाबदारीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेतील अधिकाऱ्यांकडून संयमित आणि जबाबदार वर्तनाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओवर अनेक नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया नोंदवत संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी केली होती. पोलीस प्रशासनाने अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# 'रस्ते फक्त वाहनांसाठी नाहीत'; सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट संदेश

## हरित सेतू आणि अर्बन स्ट्रीट संकल्पनेला मिळाले घटनात्मक पाठबळ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**विधानसभा आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'रस्ते अरुंद करून वाहतूक कोंडी वाढवली', 'कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी केली', 'हरित सेतू आणि अर्बन स्ट्रीट हे दिखाऊ प्रकल्प आहेत' अशा आरोपांची राजकीय धूळ उडविणाऱ्या विरोधकांना आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने जोरदार चपराक बसल्याची चर्चा शहरात रंगली आहे.**

शहरातील हरित सेतू आणि अर्बन स्ट्रीट डिझाईन या प्रकल्पांवर सातत्याने टीका होत असताना सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या ऐतिहासिक निर्णयात पदपथावर चालण्याचा अधिकार हा भारतीय संविधानातील अनुच्छेद १९(१)(डी) आणि अनुच्छेद २१ अंतर्गत नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच प्रत्येक शहरात पादचारी आणि सायकलस्वारांसाठी सुरक्षित, स्वतंत्र व अखंड मार्ग उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर असल्याचेही न्यायालयाने अधोरेखित केले आहे.

या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेने राबविलेल्या हरित सेतू आणि अर्बन स्ट्रीट प्रकल्पांना केवळ प्रशासकीय नव्हे, तर थेट सर्वोच्च न्यायालयाचे कायदेशीर पाठबळ मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. परिणामी, निवडणुकांमध्ये या प्रकल्पांवरून करण्यात आलेले अनेक राजकीय आरोप आता वास्तवाच्या कसोटीवर फोल ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.



### विरोधकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता या प्रकल्पांवर सातत्याने राजकीय टीका करणाऱ्यांची भूमिका प्रश्नचिन्हाखाली आली आहे. पादचारी आणि सायकलस्वारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांनाच विरोध करण्यामागे विकासाचा दृष्टिकोन होता की केवळ राजकीय हेतू, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मते, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे भविष्यात पिंपरी-चिंचवड शहर हे 'पादचारी आणि सायकलस्वारांना प्राधान्य देणारे देशातील आदर्श शहर' म्हणून विकसित होण्याचा मार्ग अधिक मोकळा झाला आहे.

### राजकारणासाठी विरोध, आता न्यायालयाची शिक्कामोर्तब

विधानसभा आणि आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही राजकीय पक्षांनी रस्ते अरुंद झाल्याचा मुद्दा पुढे करत हरित सेतू आणि अर्बन स्ट्रीट प्रकल्पांना लक्ष्य केले होते. पदपथ रुंद झाल्यामुळे वाहनधारकांवर अन्याय होत असल्याचा प्रचारही करण्यात आला होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत रस्ते हे केवळ वाहनांसाठी नसून पादचारी, सायकलस्वार आणि सर्वसामान्य नागरिकांसाठीही समान हक्काचे सार्वजनिक क्षेत्र असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे या संकल्पनेवर आधारित पिंपरी-चिंचवडमधील प्रकल्पांची दिशा योग्य असल्याचे अधोरेखित झाले आहे.

### ७० किलोमीटर सुरक्षित पदपथ आणि सायकल ट्रॅक

महापालिकेने अर्बन स्ट्रीट डिझाइनअंतर्गत आतापर्यंत सुमारे ४५ किलोमीटर रस्त्यांचे पुनर्रचना केली असून त्यावर सुमारे १०० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. तर हरित सेतू प्रकल्पांतर्गत २५ किलोमीटर पदपथ व सायकल ट्रॅक विकसित करण्यात आले असून त्यासाठी १३२ कोटी रुपये खर्च झाले आहेत. अशा प्रकारे शहरात एकूण ७० किलोमीटर सुरक्षित पदपथ आणि सायकल ट्रॅकचे जाळे निर्माण करण्यात आले आहे.



# दापोडीत 10.85 लाखांचा एमडी ड्रग्ज जप्त; दोघे अटकेत




**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**दापोडी परिसरात अंमली पदार्थविरोधात गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई करत 10 लाख 85 हजार 600 रुपये किमतीचे 98.56 ग्रॅम एमडी (मेफेड्रॉन) जप्त केले. या कारवाईत दोघांना अटक करण्यात आली असून मुख्य पुरवठादाराचा शोध सुरू आहे.**

गुन्हे शाखेच्या पथकाने 28 जून रोजी पहाटे एमएनजीएल सीएनजी पंपाशेजारी, सुदामाचे पोहे हॉटेलसमोर, जुना पुणे-मुंबई महामार्गावरील सर्व्हिस रोड, दापोडी येथे सापळा रचून ही कारवाई केली. आरोपींकडून 98.56 ग्रॅम एमडी, एक दुचाकी आणि एक मोबाईल असा एकूण 10 लाख 85 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आर्यन रविंद्र यादव (वय 20, न्यू मोदीखाना कॅम्प, पुणे) आणि शोएब शकील शेख उर्फ वस्ताद (वय 25, रविवार पेठ, पुणे) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांच्या चौकशीत आरोपींनी जप्त केलेला एमडी विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली. हा अंमली पदार्थ शोएब शेख उर्फ वस्ताद (गणेश पेठ, पुणे) याच्याकडून मिळाल्याची माहिती त्यांनी दिली असून, त्यानुसार मुख्य पुरवठादाराचा शोध सुरू करण्यात आला आहे.

या प्रकरणी दापोडी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये कलम 8(क), 22(क) आणि 29 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### एमडीचा विळखा; तरुणाई धोक्यात

मेफेड्रॉन (एमडी) हे कृत्रिम स्वरूपातील अत्यंत घातक अंमली पदार्थ मानले जाते. कमी वेळात जास्त नफा मिळविण्याच्या उद्देशाने काही तस्कर तरुणांना लक्ष्य करून त्याची विक्री करत असल्याचे अनेक प्रकरणांत समोर आले आहे. या व्यसनामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याबरोबरच गुन्हेगारी प्रवृत्तीलाही खतपाणी मिळते. त्यामुळे अंमली पदार्थांच्या साखळीचा पर्दाफाश करण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने विशेष मोहिमा राबविल्या जात आहेत. दापोडीतील कारवाईही त्याचाच एक भाग असून, जप्त केलेल्या एमडीचा पुरवठा नेमका कुठून होत होता आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास सुरू आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात अंमली पदार्थांच्या विक्रीबाबत किंवा संशयास्पद हालचालींबाबत माहिती मिळाल्यास ती तातडीने पोलिसांना देऊन अशा गुन्ह्यांविरोधातील लढ्यात सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अंमली पदार्थांवर पोलिसांचा करडा बडगा

दापोडीतील कारवाईत पोलिसांनी 98.56 ग्रॅम एमडी (मेफेड्रॉन), दुचाकी आणि मोबाईलसह 10.85 लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून मुख्य पुरवठादाराचा शोध सुरू आहे. अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी अशा कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.



## भूमिका

# जुलै महिन्यात तरी पुरेसा पाऊस पडणार का?



**भारतीय हवामान शास्त्र विभागाने जुलै महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. मुख्य मान्सूनचा महिना मानल्या जाणाऱ्या जुलैमध्ये दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९४ टक्के पाऊस होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले आहे.**

हा अंदाज केवळ हवामानाचा अहवाल नसून शेती, पिण्याचे पाणी, उद्योग, वीज निर्मिती आणि एकूणच अर्थव्यवस्थेसाठी सावधगिरीचा इशारा आहे. भारतीय शेती आजही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. खरिपाच्या पेरण्या, पीक वाढ आणि उत्पादन यावर जुलै महिन्यातील पावसाचा थेट परिणाम होतो. पाऊस वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात झाला तर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो; मात्र पावसात खंड पडल्यास दुबार पेरणी, उत्पादन घट आणि आर्थिक नुकसान यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे हवामान विभागाचा अंदाज गांभीर्याने घेऊन त्यानुसार कृषी नियोजन करणे आवश्यक आहे.

पावसाची तूट म्हणजे केवळ शेतीचे नुकसान नव्हे. धरणांतील पाणीसाठा, भूजल पातळी, शहरांचा पाणीपुरवठा आणि जलविद्युत निर्मिती यांवरही त्याचा परिणाम होतो. अनेक शहरांमध्ये उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या तीव्र होते. अशा वेळी जुलैमध्ये कमी पाऊस पडल्यास पुढील काही महिन्यांसाठी पाण्याचे नियोजन अधिक कठीण होऊ शकते. त्यामुळे पाणी वापरात काटकसर आणि जलसंधारणाला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे.

हवामान बदलाचे परिणाम आता अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहेत. काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत दीर्घकाळ पावसाचा अभाव असे असमतोल चित्र वारंवार पाहायला मिळत आहे. त्यामुळे केवळ सरासरी पावसावर विसंबून राहण्याऐवजी स्थानिक परिस्थितीनुसार नियोजन करणे आवश्यक ठरते. सूक्ष्म सिंचन, शेततळी, जलसंधारण, पिकांचे विविधीकरण आणि हवामानानुसार शेती पद्धती स्वीकारणे ही भविष्यासाठीची गरज आहे.

हवामान विभागाने काही भागांत सामान्य किंवा त्यापेक्षा अधिक पावसाचा अंदाजही व्यक्त केला आहे. त्यामुळे प्रत्येक राज्याने आणि जिल्ह्याने स्थानिक हवामानाचा अभ्यास करून नियोजन करणे गरजेचे आहे. ज्या भागांत कमी पाऊस अपेक्षित आहे, तेथे पाण्याचा काटेकोर वापर, तर ज्या भागांत अतिवृष्टीची शक्यता आहे तेथे पूर व्यवस्थापनाची तयारी आवश्यक आहे.

सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि कृषी यंत्रणांनी शेतकऱ्यांना वेळोवेळी अचूक माहिती, योग्य मार्गदर्शन आणि आवश्यक मदत उपलब्ध करून देणे हीदेखील महत्त्वाची जबाबदारी आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही पाणी वाचविणे, पावसाचे पाणी साठविणे आणि जलस्रोतांचे संवर्धन करणे यामध्ये सक्रिय सहभाग घ्यायला हवा.

जुलैतील कमी पावसाचा अंदाज हा घाबरण्याचा विषय नसून सजग होण्याची संधी आहे. योग्य नियोजन, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि जलसंधारणाच्या प्रभावी उपाययोजनांच्या माध्यमातून संभाव्य संकटाची तीव्रता निश्चितच कमी करता येऊ शकते. मान्सूनवर अवलंबून असलेल्या देशाने आता केवळ पावसाची वाट पाहण्याऐवजी प्रत्येक थेंबाचे योग्य व्यवस्थापन करण्याची सवय लावणे, हीच काळाची खरी गरज आहे.

## प्रासंगिक »

### सवयीची गुलामगिरी

**एका माणसाने प्रेमाने एक पोपट पिंजऱ्यात पाळला होता. त्याला रोज भरपूर अन्न, पाणी आणि माया मिळत असे. मात्र पोपटाच्या मनात स्वातंत्र्याची ओढ कायम होती.**

एके दिवशी पिंजऱ्याचे दार उघडे राहिले आणि पोपट बाहेर उडाला. पण लहानपणापासून बंदिस्त जीवन जगल्यामुळे त्याला नीट उडता येत नव्हते. जंगलातील इतर पोपटांशी त्याला जुळवूनही घेता आले नाही, कारण त्यांची भाषा आणि जगण्याची पद्धत त्याच्यासाठी अनोळखी होती. स्वतः अन्न शोधण्याची सवय नसल्याने तो उपाशी राहू लागला.

ऊन, वारा आणि पावसाचा सामना करण्याची ताकदही त्याच्यात नव्हती. काही दिवसांतच तो अशक्त झाला आणि त्याचा मृत्यू झाला.

- तात्पर्य : दीर्घकाळ परावलंबी किंवा गुलामगिरीच्या जीवनाची सवय लागली की स्वातंत्र्य मिळाले तरी त्याचा योग्य उपयोग करता येत नाही. इतरांकडून चांगल्या गोष्टी शिकाव्यात, पण आपल्या संस्कृती, स्वाभिमान आणि स्वावलंबनाची जपणूक करणे हेच खरे शहाणपण आहे.

भारतात आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट अशा विविध ओळखपत्रांचा वापर दैनंदिन व्यवहारांपासून सरकारी योजनांपर्यंत सर्वत्र केला जातो. मात्र अलीकडील न्यायालयीन निरीक्षणे आणि सरकारी स्पष्टीकरणांमुळे या कागदपत्रांची व्याप्ती आणि मर्यादा याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

# 'मी भारतीय नागरिक आहे'... पण कशाच्या आधारावर?



या पार्श्वभूमीवर नागरिकत्व सिद्ध करणारा अंतिम आणि निर्विवाद पुरावा नेमका कोणता, हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. आधार कार्ड हे ओळख आणि लाभ हस्तांतरणासाठीचे साधन आहे, पॅन कार्ड करप्रणालीसाठी आहे, मतदार ओळखपत्र मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी आहे, तर पासपोर्ट हा मुख्यतः परदेश प्रवासासाठीचा दस्तऐवज आहे. त्यामुळे या प्रत्येक कागदपत्राचा उद्देश वेगळा आहे. मात्र सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने हीच कागदपत्रे त्यांच्या भारतीय असण्याची ओळख बनली आहेत. त्यामुळे त्यांपैकी कोणतेही कागदपत्र नागरिकत्वाचा अंतिम पुरावा नाही, असे स्पष्ट झाल्यानंतर अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

भारतात नागरिकत्वाची तरतूद नागरिकत्व कायदा, १९५५ आणि संबंधित नियमांनुसार केली जाते. नागरिकत्व हे केवळ एखाद्या एका ओळखपत्रावर अवलंबून नसून जन्म, वंश, नोंदणी, नागरिकीकरण किंवा विशिष्ट कायदेशीर प्रक्रियांवर आधारित असते. त्यामुळे ओळखपत्र आणि नागरिकत्व या दोन वेगळ्या संकल्पना आहेत. परंतु ही कायदेशीर बाब नागरिकांपर्यंत स्पष्टपणे पोहोचविण्यात यंत्रणा अपयशी ठरल्याचे दिसून येते.

डिजिटल युगात सरकारने ओळख व्यवस्थेवर मोठी गुंतवणूक केली आहे. बँकिंग, कर, शासकीय अनुदाने, प्रवास आणि अनेक सेवांसाठी विविध कागदपत्रे आवश्यक ठरतात. अशा परिस्थितीत नागरिकांना वारंवार वेगवेगळे पुरावे सादर करावे लागणे ही त्रासदायक बाब आहे. विशेषतः परदेशात शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायासाठी जाणाऱ्या भारतीयांमध्येही या विषयाबाबत अनिश्चितता निर्माण होऊ शकते.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने नागरिकत्वासंदर्भातील नियम अधिक स्पष्ट, सुसंगत आणि सर्वसामान्यांना सहज समजतील अशा भाषेत मांडण्याची आवश्यकता आहे. कोणते कागदपत्र कोणत्या उद्देशासाठी आहे आणि नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी कोणती प्रक्रिया लागू होते, याबाबत व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे.

लोकशाही व्यवस्थेत नागरिकांचा शासनावरील विश्वास सर्वात महत्त्वाचा असतो. ओळख आणि नागरिकत्व याबाबतचा संभ्रम जितक्या लवकर दूर होईल, तितके नागरिक आणि प्रशासन यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ होईल. कायद्याची स्पष्टता, सुसंगत धोरण आणि प्रभावी जनजागृती हाच या प्रश्नावरील दीर्घकालीन आणि विश्वासार्ह उपाय ठरू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट ।
साधिलें अवीट निजसुख ॥१॥

सांडी मांडी मागें केल्या भरोवरी ।
अधिक चि परी दुखाचिया ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वैद्यकीय शिक्षणात ऐतिहासिक बदल

## वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेले काही कोर्सेस लवकरच इतिहासजमा होणार

**महाईन्यूज । वर्धा**

**देशातील वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात लवकरच एक अतिशय मोठा आणि ऐतिहासिक बदल पाहायला मिळणार आहे. नॅशनल मेडिकल कमिशन (NMC) ने एक अतिशय मोठा निर्णय घेत वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणात मोठे फेरबदल करण्याची घोषणा केली आहे. वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेले काही कोर्सेस लवकरच इतिहासजमा होणार आहेत. पण हे नेमके कोणते कोर्सेस आहेत आणि विद्यार्थ्यांवर याचा काय परिणाम होईल, हे बघा.**




नॅशनल मेडिकल कमिशनने (NMC) नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या एका अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे की, देशातील सर्व 'पोस्ट ग्रॅज्युएट (PG) डिप्लोमा' (Postgraduate Diploma Medical Courses) अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद केले जाणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ हे या पदव्युत्तर डिप्लोमा अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचे शेवटचे वर्ष असेल. म्हणजेच २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून देशात कोणत्याही पीजी डिप्लोमा कोर्सला प्रवेश दिला जाणार नाही आणि त्यानंतर हे कोर्सेस पूर्णपणे बंद होतील.जर पीजी डिप्लोमा कोर्सेस बंद झाले, तर जे विद्यार्थी स्पेशलायझेशन (विशेषीकरण) करू इच्छितात त्यांच्यासाठी कोणता पर्याय असेल? हा प्रश्न आहे.

वैद्यकीय आयोगाने यावरअत्यंत सकारात्मक तोडगा काढत स्पष्ट केले आहे की, हे सर्व पीजी डिप्लोमा कोर्सेस टप्प्याटप्प्याने थेट पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये, म्हणजेच 'MD' (Doctor of Medicine) आणि 'MS' (Master of Surgery) मध्ये रूपांतरित केले जातील. याचाच अर्थ असा की, वैद्यकीय विद्यार्थ्यांना आता केवळ 'डिप्लोमा' धारक राहण्याऐवजी, थेट उच्च दर्जाची 'डिग्री' (Degree) मिळवण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

### वैद्यकीय शिक्षणाचे धोरण

वैद्यकीय शिक्षणाचे धोरण ठरवणाऱ्या समितीने या निर्णयामागील भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, वैद्यकीय शिक्षणाचे जागतिक स्तरावर मानकीकरण करणे, विशेषज्ञ प्रशिक्षणाचा दर्जा वाढवणे आणि सध्याच्या संस्थात्मक क्षमतेचा (इन्फ्रास्ट्रक्चर) पुरेपूर वापर करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. NMC च्या असे निदर्शनास आले होते की, अनेक वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एकाच विषयात पीजी डिप्लोमा आणि पीजी पदवी (MD/MS) असे दोन्ही अभ्यासक्रम एकाच वेळी चालवले जात आहेत. तर काही महाविद्यालयांकडे आवश्यक पायाभूत सुविधा, तज्ज्ञ प्राध्यापक आणि क्लिनिकल साहित्य उपलब्ध असूनही ते केवळ 'डिप्लोमा' कोर्सेस चालवत आहेत.

### असे आहेत निर्देश

या महत्त्वाच्या बदलाची अंमलबजावणी करण्यासाठी NMC ने सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि संस्थांना तातडीने निर्देश दिले आहेत. ज्या महाविद्यालयांमध्ये सध्या पीजी डिप्लोमा कोर्सेस सुरू आहेत आणि ज्यांना ते अभ्यासक्रम MD किंवा MS पदवीमध्ये रूपांतरित करायचे आहेत, त्यांनी 'मेडिकल असेसमेंट अँड रेटिंग बोर्ड' (MARB) कडे ऑनलाईन पोर्टलद्वारे विहित नमुन्यात लवकरात लवकर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हा बदल स्वागतार्ह आहे, असे मत सावंगी येथील दत्ता मेघे आयुर्विज्ञान अभिमत विद्यापीठाचे सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी व्यक्त केले.

---

# अशैक्षणिक कामांचा भार कमी; शिक्षक संघटनांकडून शासनाच्या निर्णयाचे स्वागत

**महाईन्यूज । चंद्रपूर**

**राज्यातील शिक्षकांना विविध प्रकारची माहिती व अहवाल सादर करण्याच्या कामातून मोठा दिलासा मिळाला आहे. आता मुख्याध्यापक व शिक्षकांना दररोज केवळ तीन प्रकारच्या नोंदी कराव्या लागणार असून, उर्वरित माहिती आठवड्यातून एकदाच शनिवारी सादर करावी लागणार आहे.**




शालेय शिक्षण विभागाने 'माहितीचा वार शनिवार' हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शिक्षकांचा अशैक्षणिक कामांवरील वेळ कमी होऊन विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनासाठी अधिक वेळ उपलब्ध होणार आहे. या निर्णयाचे शिक्षक संघटनांकडून स्वागत करण्यात येत आहे. जिल्ह्यातील हजारो शिक्षकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, अशैक्षणिक कामातूनही शिक्षकांची सुटका करावी, अशी मागणीही केली जात आहे.

दररोज विविध पोर्टलवर माहिती भरणे, विद्यार्थी उपस्थिती, योजनांचे अहवाल, सर्वेक्षण, आकडेवारी व अन्य प्रशासकीय कामांमुळे शिक्षकांचा मोठा वेळ खर्च होत होता. त्यामुळे अध्यापनावर परिणाम होत असल्याची तक्रार सातत्याने केली जात होती. नवीन निर्णयानुसार, अत्यावश्यक माहिती वगळता इतर सर्व अहवाल आठवड्यातून एकदाच शनिवारी सादर करावे लागणार आहेत. त्यामुळे रोजच्या माहिती संकलनाच्या ताणातून शिक्षकांची सुटका होणार आहे.

जिल्ह्यात जिल्हा परिषद, अनुदानित शाळा, विनाअनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या हजारो शिक्षकांना या निर्णयाचा थेट लाभ मिळणार आहे. प्रशासकीय कामाचा भार कमी झाल्याने विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देणे शक्य होणार आहे. दररोज केवळ अत्यावश्यक तीन नोंदी ठेवाव्या लागतील. इतर सर्व माहिती शनिवारी एकत्रितपणे सादर केली जाईल. त्यामुळे वारंवार माहिती मागवण्याची पद्धत कमी होणार आहे. गेल्या काही वर्षांत शिक्षकांचा मोठा वेळ ऑनलाइन माहिती भरणे, अहवाल तयार करणे आणि विविध शासकीय कामांमध्ये जात होता. त्यामुळे गुणवत्तापूर्ण अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नव्हता.

### गुणवत्तावाढीसाठी मिळणार पुरेसा वेळ

शाळेतील उपस्थिती, आवश्यक दैनंदिन नोंदी आणि अत्यावश्यक प्रशासकीय माहिती एवढीच माहिती दररोज सादर करावी लागणार आहे. उर्वरित माहिती शनिवारी पाठवावी लागणार आहे. अशैक्षणिक कामे कमी झाल्याने शिक्षकांना पाठनियोजन, विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन, गुणवत्तावाढ आणि नवोपक्रम राबवण्यासाठी अधिक वेळ मिळेल. याचा थेट फायदा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला होण्याची अपेक्षा आहे. शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा कमी करण्याच्या दृष्टीने शासनाचा हा निर्णय स्वागतार्ह आहे.

# केंद्र सरकारच्या ‘E20’ धोरणाला दिलासा

## इथेनॉल कोटा वाढवण्याच्या कर्नाटक हायकोर्टाच्या आदेशाला ‘सर्वोच्च’ स्थगिती

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**देशातील तेल कंपन्यांना इथेनॉल पुरवठा वाढवून देण्याच्या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी तात्पुरती स्थगिती दिली. या प्रकरणात परिस्थिती ‘जैसे थे’ ठेवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. २०१५-२६ या कालावधीत इथेनॉलचे वाटप वाढवण्याचे निर्देश तेल कंपन्यांना दिले होते. दरम्यान, कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयाला भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.**




एका खासगी इथेनॉल उत्पादक कंपनीने कर्नाटक उच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर हा वाद सुरु झाला. या कंपनीने कोटा कमी मिळाल्याचा दावा करत आक्षेप घेतला होता. “आमच्या प्लांटची उत्पादन क्षमता ९.९ कोटी लीटर आहे, परंतु २०२५-२६ या वर्षासाठी आम्हाला केवळ ३.९२ कोटी लीटरचा कोटा मंजूर करण्यात आला,” असे कंपनीने म्हटले होते. तेल कंपन्यांनी याला विरोध दर्शवला होता.

न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी पार पडली. बीपीसीएलच्या वतीने देशाचे महान्यायाधिकारी आर. व्यंकटरमणी यांनी न्यायालयात बाजू मांडली. “उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे केंद्र सरकारच्या २० टक्के इथेनॉल मिश्रणाच्या धोरणावर विपरित परिणाम होऊ शकतो आणि संपूर्ण प्रक्रिया विस्कळीत होऊ शकते,” असा युक्तिवाद व्यंकटरमणी यांनी केला. केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात E20 पेट्रोलला 'चालू असलेला प्रयोग' म्हटले असले, तरी सरकारने या धोरणातून माघार घेतलेली नाही. ॲटोर्नी जनरल आर. वेंकटरामानी यांनी 'इंडिया टुडे'शी बोलताना स्पष्ट केले की, २०% इथेनॉल ब्लेंडिंगचे लक्ष्य हा सरकारचा खंबीर धोरणात्मक निर्णय असून त्यात कोणताही बदल होणार नाही.

### इथेनॉल ब्लेंडिंग म्हणजे काय?

जेव्हा बायो-फ्यूल असलेल्या इथेनॉलला पेट्रोलमध्ये ठराविक प्रमाणात मिसळले जाते, तेव्हा त्याला 'इथेनॉल ब्लेंडिंग' म्हणतात. इथेनॉल प्रामुख्याने ऊस, मका आणि भात (धान) यांसारख्या पिकांपासून तयार केले जाते. २०१४ मध्ये भारतात इथेनॉल ब्लेंडिंगचे प्रमाण अवघे १.५% होते, जे २०२६ मध्ये वेगाने वाढत थेट २०% च्या पातळीवर पोहोचले आहे. 'नॅशनल पॉलिसी ऑन बायोफ्यूल्स (२०१८)' मध्ये सुधारणा करून सरकारने २०३० चे उद्दिष्ट आधीच म्हणजे २०२५-२६ या पुरवठा वर्षातच पूर्ण केले आहे. आता २०३० पर्यंत E30 आणि हळूहळू ते १००% पर्यंत नेण्याचे सरकारचे ध्येय आहे.

### कंपन्यांचा युक्तिवाद

एका पुरवठादाराच्या मागणीनुसार कोटा बदलला, तर संपूर्ण सरकारी धोरणातच बदल करावा लागेल, असे मत कंपन्यांनी मांडले होते. मात्र, कर्नाटक उच्च न्यायालयाने कंपनीची बाजू लावून धरत बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल या तिन्ही सरकारी तेल कंपन्यांना २०२५-२६ साठी इथेनॉल वाटप वाढवण्यावर विचार करण्याचे निर्देश दिले होते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे या निर्देशाला स्थगिती मिळाली आहे. भारतात सध्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिक्स करून ‘E20’ इंधन पुरवले जात आहे.

---

## इस्रायलच्या माजी लष्करप्रमुखांचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहूंना आव्हान?

**महाईन्यूज | इराण**

**युद्ध, संघर्ष, तणाव यांच्या विळख्यात सापडलेल्या इस्रायलमध्ये ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने दक्षिण इस्रायलवर हल्ला केला होता. त्यानंतर गाझा पट्टीत इस्रायलचा संघर्ष सुरू झाला. इराण विरोधात युद्ध झाले. आता लेबनॉनबरोबर इस्रायलचा संघर्ष सुरू आहे. या सगळ्या भीषण परिस्थितीत इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांच्यावर टीका झाली. राष्ट्रीय सुरक्षेत नेतान्याहू कमी पडले, इराण विरूद्धच्या युद्धातून जे साधायचे होते ते साधता आले नाही, अशी कुजबूज इस्रायलमधील सर्वसामान्य नागरिकांमध्ये आहे.**



या पार्श्वभूमीवर नेतान्याहू यांना इस्रायली डिफेन्स फोर्सेसचे म्हणजे इस्रायली लष्कराचे माजी प्रमुख गादी एसनकोट यांचे आव्हान निर्माण झाले आहे. नेतान्याहू यांच्यापेक्षा पूर्णपणे वेगळे व्यक्तिमत्व असलेले एसनकोट इस्रायली जनतेत लोकप्रिय होत आहेत. गाझा पट्टीतील युद्धात मुलगा गमावल्याचे दुःख हदयात असल्याने एसनकोट यांची इस्रायलमधील एकंदर परिस्थितीबाबतची भूमिका वेगळी आहे. चार दशके इस्रायली सैन्यात सेवा दिलेले गादी एसनकोट कोण आहेत? बिन्यामिन नेतान्याहू यांना आव्हान का निर्माण झाले आहे?

इस्रायली लष्कराचे माजी प्रमुख गादी एसनकोट यांनी २०२२ मध्ये राजकारणात प्रवेश केला होता. इतर पक्षात राजकारण केल्यानंतर त्यांनी स्वतःचा ‘यशर पार्टी’ हा पक्ष स्थापन केला. यशर हा एक हिब्रू भाषेतील शब्द आहे. या शब्दाचा अर्थ सरळ किंवा प्रामाणिक असा होतो. यशर पार्टी या पक्षाची कोणतीही विचारधारा नाही. फक्त एक सरळ व पारदर्शक कारभार करणारे नेतृत्व देणे या उद्देशाने या पक्षाची स्थापना करण्यात आली.

जून २०२६ मध्ये प्रकाशित झालेल्या काही ‘ओपिनियन पोल’नुसार एसनकोट यांचा यशर पक्ष नेतान्याहू यांच्या लिकूड पक्षाला टक्कर देत आहे. इस्रायलच्या ‘नेसेट’ (KNESSET) संसदेच्या एकूण १२० जागा आहेत. त्यांपैकी २३ जागा नेतान्याहू यांच्या पक्षाला तर २१ जागा एसनकोट यांच्या पक्षाला मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. इस्रायलमध्ये सरकार स्थापनेसाठी अनेक पक्षांना एकत्र यावे लागते. त्यामुळे इतर पक्ष एसनकोट यांच्या पक्षाबरोबर जाऊ शकतात असा अंदाज व्यक्त केला जातोय. नेतान्याहू यांचा पक्ष उजव्या तर एसनकोट यांचा पक्ष डाव्या विचारसरणीचा आहे. इस्रायलमध्ये बहुमतात येण्यासाठी एखाद्या पक्षाला ६१ जागांची आवश्यकता असते.

### नेतान्याहू यांच्या प्रतिमेला तडा?

इस्रायलमध्ये नेतान्याहू यांची प्रतिमा “मिस्टर सेक्युरिटी” अशी होती. या प्रतिमेला तडा गेला आहे. ७ ऑक्टोबर २०२३ ला हमासने इस्रायलवर हल्ला केल्यानंतर इस्रायल संघर्षात अडकला आहे. आधी गाझा पट्टी, नंतर इराण युद्ध आणि आता लेबनॉनमधील हेजबोल्लाबरोबर संघर्ष सुरू आहे. या संघर्षातून जे साध्य करायचे होते, ते साध्य झाले नाही अशी भावना इस्रायली नागरिकांमध्ये आहे. अमेरिका – इराण करारामुळे त्यात आणखी भर पडली आहे. या करारामुळे इस्रायलचे लष्करी मोहिम स्वातंत्र्य कमी झाले, तसेच इस्रायल एकटा पडल्याची भावना इस्रायलींमध्ये आहे.

# जस्मिन भसीनच्या प्रकृतीबाबत मोठी अपडेट



टीव्ही अभिनेत्री जस्मिन भसीन सध्या गंभीर आजाराशी झुंज देत असून उपचारासाठी ती दुबईहून भारतात परतली आहे. तिचा प्रियकर आणि अभिनेता अली गोनीने रुग्णालयातील तिचा फोटो सोशल मीडियावर शेअर करत भावूक पोस्ट लिहिल्यानंतर चाहत्यांमध्ये तिच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात होती. आता स्वतः जस्मिनने तिच्या तब्येतीबाबत चाहत्यांना माहिती देत काळजी न करण्याचे आवाहन केलं आहे. यासोबतच तिने मी अजूनही धोक्याबाहेर नाही असंही म्हटलं आहे. जस्मिनला टर्मिनल इलियटिस (Terminal Ileitis) या गंभीर संसर्गजन्य आजाराचे निदान झाले आहे.

इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये तिने सांगितले की, दुबईतील डॉक्टरांनी तिला अद्याप प्रवासासाठी योग्य नसल्याचे सांगितले होते. "मी अजूनही पूर्णपणे धोक्याबाहेर नाही. मात्र डॉक्टरांनी इंजेक्शनद्वारे माझी प्रकृती स्थिर केल्यानंतर मी भारतात परतण्याचा निर्णय घेतला," असे ती म्हणाली. जस्मिनने दुबईतील डॉक्टर, रुग्णालयातील कर्मचारी आणि आरोग्य सुविधांचे कौतुक करताना सांगितले की, "तेथील उपचार उत्तम होते, पण घर म्हणजे घरच. त्यामुळे पुढील उपचार भारतातच घ्यायचे ठरवले आहे." भारतात पोहोचल्यानंतर ती दुसऱ्या रुग्णालयात दाखल होऊन उपचार सुरू ठेवणार असल्याचेही तिने स्पष्ट केले.



# जिनिलियाने अशी साजरी केली वटपौर्णिमा

अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जिनिलिया देशमुख ही जोडी मराठी आणि बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय जोडप्यांपैकी एक मानली जाते. या दोघांमधील प्रेम, जिव्हाळा आणि एकमेकांबद्दलचा आदर अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. वटपौर्णिमेनिमित्तही जिनिलियाने रितेशवरील प्रेम खास पद्धतीने व्यक्त केले. मात्र, यंदा तिने पारंपरिक पद्धतीने वडाच्या झाडाची पूजा न करता वेगळ्याच प्रकारे हा सण साजरा केला. लग्नानंतर जिनिलियाने मराठी संस्कृती, परंपरा आणि सण-उत्सव मनापासून स्वीकारले आहेत. ती दरवर्षी वटपौर्णिमा, गुढीपाडवा, गणेशोत्सव यांसारखे सण मोठ्या उत्साहात साजरे करताना दिसते. मराठी भाषा आणि परंपरांबद्दलचा तिचा आदर चाहत्यांनाही आवडतो. यंदा मात्र जिनिलिया महाराष्ट्रात नसून उत्तराखंडमधील देहराडून येथे तिच्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. त्यामुळे तिला नेहमीप्रमाणे वडाच्या झाडाची पूजा करता आली नाही. तरीही तिने वटपौर्णिमेचे महत्त्व जपत हा दिवस खास पद्धतीने साजरा केला. जिनिलियाने उत्तराखंडमधील पवित्र गंगा नदीत स्नान केले आणि भक्तिभावाने गंगेची पूजा केली. या खास क्षणांची झलक तिने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केली. गंगास्नान करतानाचा फोटो पोस्ट करत तिने रितेश देशमुखला टॅग केले आणि 'माझा नवरा' असे प्रेमळ कॅप्शन लिहिले. याशिवाय तिने 'वेड' या सुपरहिट मराठी चित्रपटातील 'सुख कळले' हे गाणेही स्टोरीला जोडले. या गाण्यामुळे तिची पोस्ट आणखी भावूक झाली.



# शाहरुख खानमुळे मिळालं पहिलं घर

बॉलिवूड अभिनेता श्रेयस तळपदेने (Shreyas Talpade) नुकताच त्याच्या आयुष्यातील एक खास किस्सा चाहत्यांसोबत शेअर केला आहे. प्रसिद्ध दिग्दर्शिका आणि कोरिओग्राफर फराह खान तिच्या कुकिंग व्लॉगसाठी श्रेयसच्या घरी पोहोचली होती. यावेळी गप्पांच्या ओघात श्रेयसने सांगितले की, मुंबईत स्वतःचे पहिले घर घेण्याचे त्याचे स्वप्न शाहरुख खान आणि फराह खान यांच्या मदतीमुळेच पूर्ण झाले. फराह खान नेहमीप्रमाणे अनेक भेटवस्तू घेऊन श्रेयसच्या घरी गेली होती. गप्पा सुरू असताना श्रेयसने 'ओम शांती ओम' चित्रपटाशी संबंधित एक आठवण सांगितली. त्याने सांगितले की, या चित्रपटामुळे त्याच्या करिअरला नवी दिशा मिळालीच, पण त्याच चित्रपटामुळे त्याला स्वतःचे पहिले घरही मिळाले. श्रेयसने सांगितले की, त्याने घर खरेदी करण्यासाठी बँकेत होम लोनसाठी अर्ज केला होता. मात्र, त्या वेळी त्याचा अर्ज मंजूर झाला नाही. बँकेतील अधिकाऱ्यांनी त्याला तो कोणत्या चित्रपटात काम करत आहे, अशी विचारणा केली. त्याने 'ओम शांती ओम' असे उत्तर दिल्यानंतर चित्रपटात मुख्य अभिनेता कोण आहे, असा पुढचा प्रश्न विचारण्यात आला. श्रेयसने शाहरुख खानचे नाव सांगितले. त्यानंतर चित्रपटाचे दिग्दर्शन कोण करत आहे, असे विचारले असता त्याने फराह खानचे नाव सांगितले. बँकेतील अधिकाऱ्यांनी त्याला शाहरुख खान किंवा फराह खान यांच्याकडून अधिकृत पत्र मिळू शकते का, अशी विचारणा केली. त्यानंतर श्रेयसने तात्काळ फराह खानला फोन करून संपूर्ण परिस्थिती सांगितली. श्रेयसच्या म्हणण्यानुसार, फराह खानने त्याची अडचण समजून घेतली आणि अवघ्या दोन दिवसांत शाहरुख खानकडून आवश्यक पत्र मिळवून दिले.



# भारताच्या महिला संघासाठी गुड न्यूज!

## ऑलिम्पिक २०२८साठी मिळाली थेट एन्ट्री, पुरुष संघाला अजून वाट पाहावी लागणार

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**महिला टी-२० विश्वचषक २०२६च्या साखळी टप्प्यातून भारतीय संघाला बाहेर पडावं लागलं होतं. ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या करो या मरो सामन्यात टीम इंडियाला पराभव पत्करावा लागला होता. या घटनेनंतर आता टीम इंडियासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. भारताच्या महिला संघाने २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवल्याची अधिकृत घोषणा आता करण्यात आली आहे. अनेक दशकांनंतर आगामी ऑलिम्पिकमध्ये क्रिकेट खेळाचा समावेश करण्यात आला आहे.**




आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती यांनी सोमवारी २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटच्या ऐतिहासिक पुनरागमनासाठी पात्रता प्रक्रियेची अधिकृत घोषणा केली. तब्बल अनेक दशकांनंतर क्रिकेटचं ऑलिम्पिकमध्ये पुनरागमन होणार असून, या स्पर्धेपूर्वी प्रथमच ICC ऑलिम्पिक पात्रता स्पर्धा आयोजित केली जाणार आहे.

लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये पुरुष आणि महिला अशा दोन्ही टी-२० स्पर्धांमध्ये प्रत्येकी सहा संघ सहभागी होतील. या स्पर्धेत आफ्रिका, आशिया, युरोप आणि ओशिनिया या चारही खंडांतील किमान एका संघाला स्थान निश्चित करण्यात आलं आहे, त्यामुळे प्रत्येक खंडाचं प्रतिनिधित्व ऑलिम्पिकमध्ये पाहायला मिळणार आहे.

पुरुष आणि महिला गटातील प्रत्येकी पाच संघांची निवड विद्यमान आयसीसी स्पर्धांमधील कामगिरी आणि आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीच्या आधारे केली जाणार आहे. ही प्रक्रिया आयसीसीच्या अधिकृत फ्युचर टूर प्रोग्राम (FTP)नुसार पार पडेल. तर पुरुष आणि महिला गटातील सहावा व अखेरचा संघ २०२७ मध्ये प्रथमच आयोजित करण्यात येणाऱ्या आयसीसी ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेच्या (ICC OLYMPICS QUALIFIER) माध्यमातून निश्चित केला जाईल.

दरम्यान, २०२६ च्या महिला टी-२० विश्वचषकातून लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठीचे पहिले चार संघ निश्चित झाले आहेत. आफ्रिका, आशिया, युरोप आणि ओशिनिया या प्रत्येक खंडातून सर्वोच्च स्थान मिळवणारे पात्र संघ म्हणून दक्षिण आफ्रिका, भारत, ग्रेट ब्रिटन (इंग्लंडमार्फत) आणि ऑस्ट्रेलिया यांनी ऑलिम्पिकचं तिकीट मिळवलं आहे. प्रत्येक खंडातून केवळ एका संघालाच थेट पात्रता देण्यात आली आहे.

अमेरिका हा २०२८ ऑलिम्पिकसाठी यजमान देश असल्याने पुरुष आणि महिला या दोन्ही गटांमध्ये त्यांना थेट पात्रतेची संधी असेल. मात्र, त्यासाठी ३० जून २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या पात्रता कालावधीत संबंधित आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अमेरिकेचा संघ किमान अव्वल-१५ मध्ये असणं आवश्यक आहे. जर अमेरिकेचा महिला संघ ही अट पूर्ण करू शकला नाही, तर १ मार्च २०२७ रोजीच्या आयसीसी टी-२० क्रमवारीनुसार अद्याप पात्र न ठरलेल्या कोणत्याही खंडातील सर्वोच्च क्रमांकाच्या संघाला पाचवं थेट स्थान दिलं जाईल.

पुरुष गटातही अमेरिकेचा संघ ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अव्वल-१५ मध्ये नसल्यास, अद्याप पात्र न ठरलेल्या सर्वाधिक मानांकित संघाला हे स्थान मिळेल. आयसीसीने अधिकृत निवेदनात म्हटलं आहे की, पुरुष गटातील उर्वरित पात्रता स्थानांचा निर्णय ३१ डिसेंबर २०२६ रोजीच्या आयसीसी टी-२० क्रमवारीनुसार घेतला जाईल. आफ्रिका, आशिया, युरोप आणि ओशिनिया या खंडांतील सर्वाधिक क्रमांकाच्या पात्र संघांना लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ मध्ये खेळण्याची संधी मिळेल.

# जर्मनीचं पॅकअप, पॅराग्वेचा दिमाखदार विजय; ब्राझिलला जपानची कडवी झुंज

**महाईन्यूज । ब्राझिल**

**जेतेपदाचे दावेदार असलेल्या जर्मनीला अनपेक्षित पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. पॅराग्वेने जर्मनीला दणका देत विजयी आगेकूच केली. निर्धारित वेळेत ही लढत १-१ अशी बरोबरीत संपली. पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ अशी बाजी मारत पॅराग्वेने जर्मनीला गाशा गुंडाळायला लावला. तर दुसरीकडे पाच वेळा विश्वविजेत्या ठरलेल्या ब्राझीलला जपानने कडवी झुंज दिली.**



## ब्राझीलचा अंतिम १६ फेरीत प्रवेश

जपानवर रोमहर्षक विजय प्राप्त करून ब्राझीलने अंतिम १६ फेरीत प्रवेश केला आहे. जपानने कडवी झुंज दिल्यामुळे प्रेक्षकांचे चांगलेच मनोरंजन झाले. सामन्यानंतर हताष झालेल्या जपानी खेळाडूंचे ब्राझीलच्या खेळाडूंनी सांत्वन केले.

ब्राझीलने २-१ असा जपानचा पराभव केला असला तरी सामन्यात जपानच्या खेळाडूंनी रचलेला चक्रव्यूह फोडताना ब्राझीलची चांगलीच दमछाक झाली. वर्ल्डकप मधून जपानचा संघ बाहेर पडला असला तरी आपल्या खेळाने त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली.

जर्मनीच्या संघाने १२० मिनिटात ७५ टक्के काळ चेंडूवर नियंत्रण राखलं. २१ वेळा त्यांनी गोलसाठी प्रयत्न केले. पेनल्टी शूटआऊटमध्ये जर्मनीतर्फे ताह, वॉल्टमेड आणि हावेट्झ यांना गोल करण्यात अपयश आले आणि पॅराग्वेने सरशी साधली. वर्ल्डकप स्पर्धेत शूटआऊटमध्ये पराभूत होण्याची जर्मनीची ही पहिलीच वेळ आहे.

चार जेतेपदं नावावर असणाऱ्या जर्मनीचं आव्हान पॅराग्वेसाठी कठीण ठरेल अशी चिन्हं होती मात्र झालं उलटंच. पॅराग्वेने गोल दागण्यात सातत्य दाखवत संस्मरणीय विजयाची नोंद केली.

पाच वेळा विश्वविजेत्या राहिलेल्या ब्राझीलला पराभूत करण्याच्या मानसिकतेत जपानचा संघ मैदानावर उतरला होता. पहिल्या हाल्फमध्ये ब्राझीलने गोल करण्यासाठी बरेच प्रयत्न केले. मात्र जपानच्या डिफेंस आणि मिडफिल्डच्या तटबंदीला त्यांना भेदता आले नाही. उलट २९ व्या मिनिटाला जपानने ब्राझीलकडून चेंडूचे नियंत्रण मिळवले आणि पहिला गोल केला. जपानचा स्ट्राइकर काइशू सानो याने २० मीटर अंतरावरून जोरदार किक मारत गोलकिपर एलिसन बेकरला चकवा दिला.

बाद फेरीत जपान ऐतिहासिक विजय प्राप्त करून विश्वविजेत्या ब्राझीलला विश्वचषकातून बाहेर करणार, असा समज पहिल्या हाल्फमध्ये झाला होता. मात्र दुसऱ्या हाल्फमध्ये ब्राझीलने आपली रणनीती बदलली.

दुसऱ्या हाल्फमध्ये जपानने आपला डिफेंस आणखी बळकट केला. फुटबॉलमध्ये प्रसिद्ध असलेल्या 'पार्क द बस' या रणनीतीचा अवलंब केला. (यात संघाचे बहुसंख्य खेळाडू गोल वाचविण्यासाठी तैनात केले जातात) ब्राझीलच्या खेळाडूंनी जपानचा चक्रव्यूह फोडण्यासाठी अनेक प्रयत्न केले. अखेर ५६ व्या मिनिटाला ब्राझीलच्या गॅब्रियलच्या पासवर कॅसेमिरोने केलेला हेडर जपानी गोलकिपर सुझुकीला भेदून गोलपोस्टमध्ये गेला.

ब्राझीलने बरोबरी साधली तरी त्यांना निर्णायक आणि अखेरचा गोल करण्यासाठी कडवी झुंज द्यावी लागली. जपान आणि ब्राझीलकडून उच्च दर्जाचा खेळ सादर केला गेला. अखेर अतिरिक्त वेळेच्या आधी ९६ व्या मिनिटाला ब्राझीलच्या युवा फॉरवर्डने केलेल्या पासवर गॅब्रिएल मार्टिनेलीने शानदार गोल केला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। बुधवार ।
दि. 01 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# सांगवी पुलाच्या रोषणाईत १७ कोटींचा घोटाळा?

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

ममतानगर, सांगवी येथील मुळा नदी पुलावरील रोषणाई व सुशोभीकरणाच्या कामावर झालेल्या खर्चावरून पिंपरी-चिंचवड महापालिकेत नवा वाद निर्माण झाला आहे. या कामामध्ये आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करत विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे.

भोईर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, सांगवी पुलावरील रोषणाई व सुशोभीकरणाच्या खर्चाची माहिती स्थापत्य विभागाकडून मागविण्यात आली होती. प्राप्त माहितीनुसार, या कामात लोखंडी फ्रेम, विविध लोखंडी साहित्य आणि इतर पूरक साहित्याचा वापर करण्यात आला आहे. या सर्व खर्चाची बेरीज केली असता सुमारे 2 कोटी 27 लाख 50 हजार रुपये इतका खर्च अपेक्षित असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

याशिवाय एलईडी दिवे, विद्युत साहित्य, केबलिंग, नियंत्रण यंत्रणा, रंगकाम, वाहतूक आणि इतर पूरक खर्च विचारात घेतला तरी संपूर्ण प्रकल्पाचा खर्च कमाल 5 कोटी रुपये इतकाच असायला हवा होता. मात्र, प्रत्यक्षात या कामावर 22 कोटी रुपये खर्च झाल्याचे दाखविण्यात आले आहे. त्यामुळे सुमारे 17 कोटी रुपयांच्या वाढीव खर्चाबाबत संशय निर्माण झाल्याचे भोईर यांनी म्हटले आहे.

या खर्चाची सविस्तर माहिती सार्वजनिक करण्यात यावी तसेच या प्रकरणात महापालिका निधीचा अपव्यय अथवा आर्थिक अनियमितता झाली आहे का, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. यासाठी स्वतंत्र तांत्रिक समितीमार्फत प्रत्यक्ष कामाचे मोजमाप व साहित्याची पडताळणी करण्यात यावी. तसेच स्वतंत्र आर्थिक लेखापरीक्षण (ऑडिट) करून अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, बिले आणि मंजुरी आदेशांची तपासणी करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

महापालिकेच्या सार्वजनिक निधीशी संबंधित हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे असल्याने तक्रारीची तातडीने दखल घेऊन चौकशीचे आदेश द्यावेत, असे निवेदन आयुक्तांना देण्यात आले आहे. दरम्यान, या आरोपांबाबत महापालिका प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## चौकशीची मागणी

सांगवी पुलावरील रोषणाई व सुशोभीकरणाच्या कामातील खर्चाची स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक चौकशी करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे. अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, बिले आणि मंजुरी आदेशांची पडताळणी करून खर्चाचा संपूर्ण हिशोब सार्वजनिक करावा, अशीही त्यांनी मागणी केली आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*




**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp



CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पवना थेट जलवाहिनी प्रकल्प : मावळातील शेतकऱ्यांची भूमिका काय?

## शहराच्या पाण्याला विरोध नाही, पण नदीतील प्रवाह कायम ठेवण्याची ठाम मागणी

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**गेल्या सुमारे १५ वर्षांपासून रखडलेल्या पवना थेट बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाची चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. ३ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत होणाऱ्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर मावळातील शेतकरी, धरणग्रस्त आणि विविध संघटनांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांचा स्पष्ट संदेश आहे की, पिंपरी-चिंचवड शहराला पाणी देण्यास आमचा विरोध नाही; मात्र नदीतील नैसर्गिक प्रवाह कायम ठेवला गेला पाहिजे.**

मावळातील शेतकऱ्यांच्या मते, सध्या पवना धरणातून नदीपात्रात पाणी सोडले जाते. त्याच पाण्यावर परिसरातील शेती, पशुधन, पर्यावरण आणि स्थानिक अर्थव्यवस्था अवलंबून आहे. जर धरणातून थेट बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी पिंपरी-चिंचवडकडे वळविण्यात आले, तर नदीतील पाण्याचा प्रवाह कमी होऊन शेतीसह संपूर्ण ग्रामीण अर्थकारणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शेतकरी संघटनांच्या म्हणण्यानुसार, नदीतील पाण्यावर हजारो एकर बागायती शेती, फुलशेती, भाजीपाला, ऊस, फळबागा तसेच पशुपालन व्यवसाय अवलंबून आहे. नदीतील प्रवाह कमी झाल्यास या संपूर्ण अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

शेतकरी संघटनांनी शासनासमोर पर्यायी प्रस्तावही मांडला आहे. त्यानुसार, सध्याप्रमाणे धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्याची व्यवस्था कायम ठेवावी. त्यानंतर गहुंजे परिसरातून आवश्यक तेवढे पाणी उचलून पिंपरी-चिंचवडकडे वळविण्याचा पर्याय स्वीकारावा. त्यामुळे शहराची पाण्याची गरज पूर्ण होईल आणि नदीतील प्रवाहही कायम राहील, असा त्यांचा दावा आहे.

या प्रश्नावर विविध राजकीय पक्षांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनीही शेतकऱ्यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ३ जुलै रोजी मुंबईत होणाऱ्या बैठकीत पवना थेट जलवाहिनी प्रकल्पावर सविस्तर चर्चा होणार आहे. या बैठकीत प्रकल्पाच्या पुढील दिशेबाबत महत्त्वपूर्ण निर्णय होण्याची शक्यता असल्याने मावळातील शेतकरी, धरणग्रस्त, स्थानिक नागरिक आणि पिंपरी-चिंचवडकरांचे या बैठकीकडे लक्ष लागले आहे.




### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

- पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा सुरू ठेवावा; मात्र नदीतील प्रवाह कायम ठेवावा.
- धरणातून नदीपात्रात पाणी सोडण्याची विद्यमान व्यवस्था कायम ठेवावी.
- गहुंजे परिसरातून पाणी उचलण्याच्या पर्यायाचा गंभीरपणे विचार करावा.
- धरणग्रस्त आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या हितांचे संरक्षण करावे.
- सर्व संबंधितांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घ्यावा.

> गेल्या अनेक दशकांपासून पिंपरी-चिंचवड शहराला पवना धरणातून पाणीपुरवठा होत असून, शहराच्या विकासात या पाण्याचा मोठा वाटा आहे. त्यामुळे भविष्यातील कोणताही निर्णय घेताना धरणग्रस्त आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या हिताचाही तितकाच विचार व्हावा."
>
> – **ज्ञानेश्वर दळवी, शेतकरी नेते**

> पवना बंदिस्त जलवाहिनीला आमचा कालही विरोध होता आणि आजही आहे. पाइपलाइनमुळे नदीतील पाणी कमी झाले, तर आमच्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल. शासनाला पिंपरी-चिंचवडला स्वच्छ पाणी द्यायचे असेल, तर नदी सुधार प्रकल्पासारखा पर्याय स्वीकारावा.
>
> – **ज्ञानेश्वर ठाकर, फुल उत्पादक शेतकरी**


> "बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाला आमचा विरोध कायम आहे. शहराच्या पाणीपुरवठ्याबरोबरच धरणग्रस्तांचे पुनर्वसन, प्रलंबित प्रश्न आणि पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवरही शासनाने लक्ष केंद्रित करावे."
>
> – **आशिष ठोंबरे, तालुकाप्रमुख, शिवसेना (ठाकरे गट)**

> "पिंपरी-चिंचवड शहराला भविष्यातील गरज लक्षात घेऊन स्वच्छ आणि शाश्वत पाणीपुरवठा होणे ही काळाची गरज आहे. त्याचवेळी मावळातील शेतकरी, धरणग्रस्त आणि स्थानिक नागरिकांच्या भावना, शेती तसेच पर्यावरणाचे हित अबाधित राहणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या बैठकीत सर्व संबंधितांची भूमिका ऐकून शहराच्या पाण्याची गरज आणि मावळच्या हिताचा समतोल साधणारा सर्वमान्य मार्ग निश्चित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. कोणावरही अन्याय होणार नाही आणि सर्वांच्या हिताचे समाधानकारक समाधान निघेल, यासाठी शासन सकारात्मक आहे."
>
> – **महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# मालमत्तेच्या वादातून निर्घृण खून; पिंपळे गुरवमध्ये एकास अटक

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपळे गुरव येथील लक्ष्मीनगर परिसरात मालमत्तेच्या वादातून एका व्यक्तीचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सांगवी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे.**




पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, कन्नन बालकृष्ण पदाची (मृत) आणि आरोपी सेल्वराज राजगाम (वय ५२, रा. पिंपळे गुरव) यांच्यात मालमत्तेच्या कारणावरून वाद सुरू होता. या वादातून आरोपीने मृताच्या डोक्यात दगडी फरशीने वार करून तसेच लोखंडी रॉडने गळ्यावर वार करत त्याचा खून केल्याचा आरोप आहे.

ही घटना २८ जून रोजी पहाटे अडीचच्या सुमारास लक्ष्मीनगर लेन क्रमांक ४ येथील वैष्णवी शॉपजवळ घडली. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक विजय शेळार यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) तसेच शस्त्र अधिनियम कलम ४(२५), ४(२७) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सांगवी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# पावसाळी आपत्तीचा सामना करण्यासाठी ‘पीएमआरडीए’ सज्ज

## पुणे महानगर क्षेत्राला 'पीडीआरएफ' व अग्निशमन दलाच्या सुरक्षेचे अभेद्य कवच!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) क्षेत्रातील वाढते नागरीकरण, डोंगराळ भाग, घाट परिसर, धरण क्षेत्र आणि नद्या-नाल्यांची भौगोलिक विविधता लक्षात घेऊन ‘पीएमआरडीए’चे ‘पुणे महानगर आपत्ती प्रतिसाद पथक’ (पीडीआरएफ) व अग्निशमन दल हे पावसाळी आपत्तीचा सामना करण्यासाठी पूर्णतः सज्ज झाले आहे. मान्सूनच्या काळात अतिवृष्टीमुळे उद्भवू शकणारी पूरपरिस्थिती, भूस्खलन, दरडी कोसळणे, झाडे पडणे आणि रस्ते खचणे यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी अग्निशमन सेवा आणि ‘पीडीआरएफ’ पथकाने आपली तयारी पूर्ण केली आहे. मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांच्या थेट मार्गदर्शनाखाली हे पथक २४ तास संपूर्ण पुणे महानगर क्षेत्रासाठी धावून जाण्यास सज्ज असून, क्षेत्रात एक प्रकारे सुरक्षेचे अभेद्य कवच निर्माण करण्यात आले आहे.**



> “आपत्ती घडल्यानंतर बचावकार्य करण्यापेक्षा आपत्तीपूर्व जनजागृती, सतर्कता आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे अधिक महत्त्वाचे आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि प्रशासनाशी वेळेवर साधलेला समन्वय यामुळे अनेक मोठी संकटे व जीवितहानी टाळता येऊ शकते.
>
> **– देवेंद्र पोटफोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी, पीएमआरडीए.**

‘पीएमआरडीए’ने स्थापन केलेल्या अग्निशमन दल व ‘पीडीआरएफ’ पथकाने अत्यंत कमी कालावधीत पूर नियंत्रण आणि बचावकार्यामध्ये आपली उपयुक्तता सिद्ध केली आहे. या पथकाने आतापर्यंत पुणे महानगर हद्दीत तब्बल ३०० हून अधिक अग्निदुर्घटनांमध्ये तातडीने धाव घेत अग्निशमन केले असून, १८९ यशस्वी बचावकार्ये पार पाडली आहेत. पुण्यात झालेल्या मागील अतिवृष्टीदरम्यान वाघोली, विश्रांतवाडी, सुस आणि बावधान या भागांत पूरपरिस्थिती निर्माण झाली असता, या जवानांनी रबर बोटींच्या साहाय्याने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले होते, तर शांतीनगर येथील पूरग्रस्त निवासी इमारतीत अडकलेल्या नागरिकांची सुरक्षित सुटका केली होती. खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असताना संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी सिंहगड रस्ता, नांदे आणि शिवणे जोडणारा पूल वाहतुकीसाठी बंद ठेवून पथकाने चोख खबरदारी घेतली होती. याशिवाय, किर्कटवाडी येथील रस्त्यावरील झाडे हटवून वाहतूक कोंडी दूर करण्यापासून ते देहू येथील इंद्रायणी नदीत आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे प्राण स्थानिक नागरिक व पोलिसांच्या मदतीने वेळेत वाचवण्यापर्यंत या जवानांनी अतुलनीय कामगिरी केली आहे.

पुणे जिल्ह्याने यापूर्वी माळीण येथील भीषण दरड दुर्घटना तसेच लवासा व पश्चिम घाट परिसरातील अतिवृष्टीमुळे घडणाऱ्या भूस्खलनाच्या घटना अनुभवल्या आहेत. या दुर्घटनांमधून धडा घेत केवळ आपत्तीनंतर बचावकार्य करण्यापेक्षा ‘प्रतिबंधात्मक उपाययोजना’ राबविण्यावर प्राधिकरणाचा विशेष भर आहे. यासाठी भूस्खलनास संभाव्य डोंगरउतार, घाट रस्ते व संवेदनशील गावांची माहिती स्थानिक प्रशासनाकडून सतत अद्ययावत केली जात आहे. अतिवृष्टीचा इशारा मिळाल्यास संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून नागरिकांना वेळेत सतर्क करणे, आवश्यकतेनुसार धोकादायक भागातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करणे आणि जलद प्रतिसादासाठी प्रशिक्षित बचाव पथके, बोटी, रोप रेस्क्यू साहित्य व कटिंग उपकरणे सतत सज्ज ठेवण्यात आली आहेत. स्थानिक ग्रामपंचायती, महसूल, पोलीस आणि आरोग्य विभागाशी समन्वय वाढवून मान्सूनपूर्व मॉक ड्रिल्स (सराव) व प्रत्यक्ष बचाव सरावही पूर्ण करण्यात आला आहे.

या संपूर्ण आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला मनुष्यबळ आणि अत्याधुनिक उपकरणांचे मोठे बळ लाभले आहे. ‘पीएमआरडीए’च्या अंतर्गत सध्या तीन अग्निशमन केंद्रे कार्यान्वित असून, तेथे ६० कंत्राटी मनुष्यबळ कार्यरत आहे. या दलाच्या जोडीला आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी ३० कर्मचाऱ्यांचे विशेष पीडीआरएफ पथक तैनात करण्यात आले आहे. यामध्ये अत्यंत कुशल आणि प्रशिक्षित अशा २० जवानांचा व १० वाहनचालकांचा समावेश आहे. आपत्तीच्या ठिकाणी अत्यंत जलद गतीने पोहोचण्यासाठी या पथकाला विशेष अत्याधुनिक वाहने, जीवरक्षक साधने आणि तांत्रिक उपकरणांनी सुसज्ज करण्यात आले आहे. हे पथक मदत व पुनर्वसन कार्य, नियमित कठोर प्रशिक्षण आणि विविध यंत्रणांसोबत रंगीत तालीम करून सदैव तत्पर आहे.

आपत्ती घडल्यानंतर बचावकार्य करण्यापेक्षा आपत्तीपूर्व जनजागृती, सतर्कता आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे अधिक महत्त्वाचे आहे, असे स्पष्ट करत ‘पीएमआरडीए’चे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी नागरिकांना मान्सून काळात सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. मुसळधार पावसादरम्यान डोंगरउतार, दरडीप्रवण भाग व कड्यांच्या पायथ्याशी थांबणे किंवा पर्यटनस्थळांवर जाणे पूर्णपणे टाळावे, असे त्यांनी म्हटले आहे. मातीमध्ये मोठ्या भेगा पडणे, झाडे किंवा विद्युत खांब झुकणे, डोंगरावरून दगड घसरू लागणे, घरांच्या भिंतींना तडे जाणे किंवा जमिनीत असामान्य हालचाल जाणवल्यास ही भूस्खलनाची प्रारंभिक लक्षणे असू शकतात. अशी चिन्हे दिसल्यास नागरिकांनी तात्काळ सुरक्षित स्थळी जावे व प्रशासनाला माहिती द्यावी. तसेच, वेगाने वाहणारे ओढे, नाले किंवा पूरग्रस्त रस्ते ओलांडण्याचा जीवघेणा प्रयत्न करू नये आणि हवामान विभाग तसेच स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती आढळल्यास नागरिकांनी तात्काळ ९५४५२८२९३० या ‘पीडीआरएफ’च्या नियंत्रण कक्षाच्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी केले आहे.

# हरेश नखाते यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा शिंदेच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुंबई येथील निवासस्थानी हरेश आबा नखाते व सुजाता हरेश नखाते यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत, मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे तसेच माजी खासदार आनंद परांजपे आदी उपस्थित होते.**



पक्षप्रवेशाच्या वेळी विभागप्रमुख गोरख पाटील, अमोल राठोड, एकनाथ मंजाळ, संभाजी नढे, काटे मामा, बाळासाहेब येडे, महादेव बिक्कड, कृष्णा येळवे, राम खमीतकर, सुधीर दुधमल, प्रजाक नढे, सुभाष काजारी, रोहित नखाते, लक्ष्मण टोणपे, मनीषा येडे, मनोज जगताप, अर्जुन गोरगेल आणि हर्षल धाकतोडे यांनीही शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

हरेश नखाते व सुजाता नखाते यांच्या या पक्षप्रवेशामुळे परिसरातील शिवसेना संघटनेला बळ मिळणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station